Row House No 38

करारनामा

लिहून घेणार – गायत्री **कल्याण शिनगारे,**

वय - २९ वर्षे, धंदा – परिचारिका

रा. नागोबा, गल्ली पेठ, बीड ,महराष्ट्र

आधार क्र. ६४०३ ८६८३ ७१५२

लिहून देणार – **डॉ. मेराजखान खय्युमखान पठाण,**

वय - ४९ वर्षे, धंदा – व्यापार,

रा. झिंगण्णा गल्ली, लातूर ता.जि. लातूर

आधार क्र. ३९४४ २४१३ ७८५१

कारणे करारनामा लिहून देतो की, खरेदीखत दस्त क्र.१०७९२/२०२१ दि. २१/१२/२०२१ अन्वये माझ्या मालकी कब्जे वहीवाटीचा ची प्लॉट मौजे आर वी जि.लातूर भागातील असून त्याचा जमीन गट क्र. ८० पैकीचा प्लॉट क्र. ३८, ग्रापंक्र. ५४२१/२; ज्याची लांबी - पूर्व पश्चिम १५.२४ मी, रुंदी - दक्षिण उत्तर ६.०९ मी, एकूण क्षेत्रफळ ९२.८१ चौ. मी ;चतु: सिमा - पूर्वेस – ९ मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस – प्लॉट क्र. ३९, दक्षिणेस – फुट रुंदीचा रस्ता/ प्लॉट क्र., उत्तरेस – फुट रुंदीचा रस्ता/ प्लॉट क्र., येणेप्रमाणे वरील नमूद प्लॉट/ जागा त्यातील तदंगभूत वस्तूसह लिहून घेणार यांना एकूण रक्कम रुपये ४५,००,०००/- (अक्षरी पंचेचाळीस लाख रुपये फक्त) मध्ये कायमस्वरूपी विक्री करण्याचा करार केला असून त्याच्या इसारापोटी रक्कम रुपये २,००,०००/- (अक्षरी दोन लाख रुपये फक्त) लिहून देणार यांना लिहून घेणार यांच्याकडून आज रोजी नगदी रोख मिळाले आहेत. उर्वरीत रक्कम रुपये ४३,००,०००/- (अक्षरी त्रेचाळीस लाख रुपये फक्त) दि. ०६/१०/२०२६ रोजी पर्यंत देण्याचे व त्याचवेळी खरेदीखत करण्याचे ठरले आहे. खरेदीखतासाठी लागणारे सर्व कागदपत्रांची पुर्तता लिहून देणार यांनी करून देण्याचे ठरले आहे. जसे ग्रा.पं. चा लिहून देणार यांच्या नावाचा ८ अ उतारा, ७/१२ उतारा ची पूर्तता लिहून देणार यांनी करून देण्याचे ठरले आहे. सदरील जागा निर्विवाद व निर्जोखिम व बोजारहित आहे. यापूर्वी सदरील जागेबाबत कोणासोबतही कसल्याही प्रकारचा व्यवहार केला नाही, काही वाद निघाल्यास त्याचे सर्वस्वी सारले स्वखर्चाने करून देण्याची जवाबदारी लिहून देणार यांची राहील.

सबब हा करारनामा मी माझ्या राजीखुशीने, अक्कलहुशारीने कसल्याही दबावास बळी न पडता साक्षीदारा समक्ष लिहून दिले आहे. हे सत्य व बरोबर आहे. दि: ०६/०९/२०२६

लिहून घेणार -
गायत्री कल्याण शिमगार

लिहून देणार -
डॉ. मेराजखान खय्युमखान पठाण

साक्षीदार -
१)
२) इमतीयाज महेबूब शेख

# // खरेदीखत //

झोन नं.९.४

खरेदीखत खुल्या प्लॉटचे मौजे आर्वी,ता.जि.लातूर येथील याची बाजारी किंमत **रक्कम रुपये** ९०,०००/ (अक्षरी : नव्वद हजार रूपयाचे) दिनांक २१/१२/२०२१ ईसवी.

लिहून घेणार :- डॉ.मेराजखान खय्युमखान पठाण
वय ४३ वर्षे, धंदा - वैद्यकिय,
रा. झिंगणप्पा गल्ली,लातुर ता.जि.लातुर
आधार नंबर - ३९४४ २४१३ ७८५१

लिहून देणार :- सुलतान सत्तार खोरीवाले
वय ३० वर्षे धंदा - व्यापार,
रा. सुळ गल्ली,लातुर ता.जि.लातुर
आधार नंबर - ६५६१ ०४२८ ७२८९

लातूर - २
द.क्र.: 9009 / 2021
3 / 30

सुमार सन २०२१ ईसवी कारणे कायम खुष खरेदीखत खुल्या प्लॉटचे लिहून देतो ऐसा जे की, माझ्या खरेदी मालकी कब्जेवहिवाटीचा प्लॉट याचा **खरेदीखत** दस्त डे.बु.नंबर ९०७५/२०२१ दि.१५/११/२०२१ **इसवी** अन्वये खरेदी घेतलेला खुला प्लॉट ज्याची ग्रामपंचायत व महसुल दप्तरी माझ्या नावाची मालक म्हणुन नोंद असलेला खुला प्लॉट. जो मी विद्यमान मालक या नात्याने आजतागायत उपभोग घेत असलेला खुला प्लॉट.

नोंदणी तुकडी जिल्हा व जिल्हा परिषद लातूर पोट तुकडी तालुका व पंचायत समिती लातूर पैकी ग्रामपंचायत मौजे आर्वी, ता.जि.लातूर येथील जुना जमीन जमीन गट नंबर ८० पैकीचा एन.ए. झालेला खुला प्लॉट

| एन.ए.नंबर | लेआऊट नंबर |
|---|---|
| २०१८/जेएमवी-१/डेस्क-१/लातुर/सीआर-८७<br>दिनांक १२/१०/२०१८ इसवी अन्वये<br>मे.कलेक्टर ऑफिस,लातुर | एनए/आर्वी/ग.नं.८०/ता.जि.लातुर/एनआरएल/६६२<br>दिनांक १३/०७/२०१८ इसवी अन्वये<br>नगर रचनाकार,लातुर |

मौजे आर्वी, ता.जि.लातूर येथील प्लॉट

| गट नं. | प्लॉट नं. | ग्रा.पं.नं. | लांबी | रुंदी | एकुण क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|
| ८० पैकी | ३८ | ५४२१/२ | पुर्व-पश्चिम १५.२४ मी. | दक्षिण-उत्तर ६.०९ मी. | ९२.८१ चौ.मी. |

याची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | :- | ९ मीटर रुंदीचा रस्ता |
| पश्चिमेस | :- | प्लॉट नंबर ३९ |
| दक्षिणेस | :- | ९ मीटर रुंदीचा रस्ता |
| उत्तरेस | :- | प्लॉट नंबर ३७ |

या कालावधीमध्ये महाराष्ट्र नगर रचना अधिनियम १९६६ च्या अनुषंगाने बिनशेती करण्याची व रेखांकनाची प्रक्रीया त्यावेळीच्या प्रचलित तरतुदीच्या अनुषंगाने अगोदरच अवलंबलेली आहे. केंद्रशासनाच्या किंवा राज्यशासनाच्या कायद्यान्वये सदर दस्तातील मिळकत हस्तांतर करणेवर निर्बंध नाही.

माझ्या सामाईक अविभक्त हिस्यापैकी प्लॉट नंबर ३८ पैकी मध्य भाग विक्री होत असल्यामुळे अकृषी आदेशावरुन अट क्र ४ (ii) व ३ (ii) चा भंग होत नाही.

याची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | :- | ९ मीटर रुंदीचा रस्ता |
| पश्चिमेस | :- | प्लॉट नंबर ३९ |
| दक्षिणेस | :- | सदर प्लॉट नंबर ३८ चा भाग |
| उत्तरेस | :- | सदर प्लॉट नंबर ३८ चा भाग |

दुय्यम निबंधक श्रेणी-२, लातूर यांची मुद्रा

लतर - २
द.क्र.: 900८/२१
४/30

येणे प्रमाणे वरील चतु:सिमेच्या आतील खुला प्लॉट मी तुम्हास सर्व तदंगभुत वस्तुसह किंमत रक्कम रूपये ९०,०००/- (अक्षरी : नव्वद हजार रूपया) मध्ये विक्री करण्याचा ठराव केला असुन ठरावाची संपुर्ण रक्कम रूपये ९०,०००/- (अक्षरी : नव्वद हजार रूपया) हे मी तुमच्याकडुन पुर्वीच वेळोवेळी घेऊन भरुन पावलो. अशी ठरावाची संपुर्ण रक्कम मी घेऊन भरुन पावलो. सदर रक्कम मी माझ्या कौटुंबीक व आर्थीक गरजेपोटी घेवून भरून पावलो. रक्कमेबाबत माझी काही तक्रार राहीली नाही.